!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५७ २०-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी

## शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचे प्रतिपादन

**संभाजीनगर ( ता.२१ ) :** दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी शिवसेना खंबीरपणे उभी असुन सरकार मदत करो न करो शिवसेनेचा प्रत्येक मावळा प्रत्येक शेतकऱ्याला साथ देण्यासाठी मदतीला धावुन येत आहे. विकासासाठी शिवसेना कटीबध्द असुन तिचे आपल्याला गरज भासेल तिथे हाक द्या आपले सेवेत हजर होऊ असे प्रतिपादन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजनेत मोठ्या संख्येने नोंदणी करण्याचे आवाहन केले.

धोंदलगाव (ता. वैजापुर) येथे शिवजल क्रांती योजनेच्या कामाचा शुभारंभ खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते करण्यात आला. या कामासाठी खासदार चंद्रकांत खैरे यांनी पोकलॅन उपलब्ध करुन दिला व खासदार निधीतुन बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृहाचे लोकार्पण ही यावेळी करण्यात आले. जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, माजी आमदार आर. एम. वाणी, जिल्हाकृषी अधिकारी पडवळ, उपजिल्हाधिकारी लक्ष्मीकांत सातारकर, उपविभागीय कृषी अधिकारी उदय देवळाणकर, तालुकाप्रमुख रमेश बोरनारे, गटविकास अधिकारी डी. एस. अहिरे, तालुका कृषी मुनीर शेख, श्री. शेख, उप अभियंता पवार, बोरसे, संजय निकम, रामहरी जाधव, नंदकुमार शिंदे, प्रकाश शिंदे यांची यावेळी उपस्थिती होती.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजनेत तुम्ही फक्त लग्न जुळवा बाकी सर्व खर्च शिवसेना करेल त्यासाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांकडे नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख अंबादास दानवे यांनी केले. शासन मदत करत नाही परंतु शिवसेना मदतीला धावुन येत आहे. भाजप सरकारी कार्यक्रमात शिवसेनेच्या पदाधिकारी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेत नाही याबद्दल माजी आमदार आर. एम. वाणी यांनी नाराजी व्यक्त केली.

यावेळी अशोक ढंगारे, सुरेश पानसरे, सुरेश कर्डीले, सुभाष वाघ, रावसाहेब वाघ, वसंत ढंगारे, विनोद सोळम, दत्तु आवारे, रावसाहेब वाघ, वसंत वाघ, भाऊसाहेब वाघ, किशोर आव्हारे, भाऊसाहेब आव्हारे, भाऊसाहेब धुराट, विश्वनाथ स्वामी, राजु खरे, संजय जैस्वाल, साहेबराव घोडके, वंसत ढंगारे आदिंसह शिवसैनिक आजी माजी पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525